दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 55 ■ शनिवार, 16 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


**सुविचार**

अशक्य हा शब्द फक्त भ्याडच वापरतात; शूर आणि बुद्धिमान लोक स्वतःचा मार्ग बनवतात.






## प्रशासन ॲक्शन मोडवर; २४ दिवसात २६ बालविवाह रोखण्यात यश

# कोवळे हात पिवळे होण्यापूर्वीच रोखले २६ बालविवाह

## जिल्ह्यात जनजागृतीची व्यापक चळवळ राबविण्याची गरज

सज्जन यादव । आरंभ मराठी

**धाराशिव – हातात पेन पुस्तक घेवून शिक्षणाची वाट चालण्याच्या वयात लग्नाच्या बोहल्यावर चढवण्याच्या अमानुष प्रथेला जिल्हा प्रशासनाने कडक लगाम घातला आहे. बालविवाहाच्या सामाजिक कुप्रथेविरोधात जिल्हा प्रशासनाने अक्षय तृतीयेच्या दिवशी सुरू केलेल्या मोहिमेत तब्बल २६ बालविवाह रोखले आहेत. मागील २४ दिवसात हे २६ बालविवाह रोखले. धाराशिव जिल्ह्यात मागील तीन आठवड्यात सरासरी दररोज एक बालविवाह आयोजित करण्यात आला होता. सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने ही धक्कादायक बाब असून, हे रोखण्यासाठी व्यापक जनचळवळ हाती घेण्याची गरज निर्माण झाली आहे.**



अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर धाराशिव जिल्ह्यात बालविवाह होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी प्रशासनाला सूचना दिल्या होत्या. महिला आणि बालविकास अधिकारी किशोर गोरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे यांनी यासाठी दोन टीम तयार केल्या होत्या. या टीममध्ये बाल संरक्षण अधिकारी विभावरी खुने, चाइल्ड हेल्पलाइन प्रकल्प समन्वयक विकास चव्हाण, अमर भोसले, शारदा मंडले, श्रीकांत साठे यांच्यासह इतर अनेक सहकाऱ्यांचा समावेश होता. या दोन्ही टीमने पहिल्या दिवसापासूनच बालविवाह रोखण्यासाठी व्यापक मोहीम राबवली. त्यामुळे मागील २४ दिवसांत तब्बल २६ बालविवाह रोखण्यात यश आले. यंदा ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असली तरी कोवळ्या वयात आयुष्याची दिशा बदलणारे विवाह थांबवण्यात प्रशासनाला मिळालेले यश महत्त्वपूर्ण मानले जात आहे. मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असल्यास तो विवाह कायद्याने बालविवाह ठरतो. अशा विवाहांना प्रतिबंध घालण्यासाठी महिला व बालविकास विभाग, पोलीस, बाल संरक्षण कक्ष, ग्राम बाल संरक्षण समिती, अंगणवाडी सेविका, शिक्षक, पोलीस पाटील यांच्या संयुक्त समन्वयातून जिल्हाभरात कारवाई करण्यात आली. काही प्रकरणांमध्ये विवाह सोहळा सुरू होण्यापूर्वीच पथकांनी धाड टाकून बालविवाह रोखले तर काही ठिकाणी पालकांकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले. आवश्यकतेनुसार अल्पवयीन मुलींना संरक्षणासाठी बालगृहात हलविण्याची कार्यवाहीदेखील करण्यात आली. त्यानंतर संबंधित बालक व पालकांचे समुपदेशन करून पुनर्वसनाची प्रक्रिया राबविण्यात आली. जिल्ह्यात धाराशिव तालुक्यात ६ बालविवाह रोखले. त्याखालोखाल उमरगा आणि भूम तालुक्यात प्रत्येकी ५ बालविवाह रोखले. यात विशेष घटना म्हणजे दिनांक ६ मे रोजी भूम तालुक्यातील एका गावात एकाच दिवशी होणारे चार बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले. ज्या ठिकाणी हे चार बालविवाह रोखले होते त्या ठिकाणी ना रस्ता आहे, ना वीज आहे ना मोबाईल नेटवर्क. त्यामुळे मोठी कसरत करत प्रशासनाला तिथे पोहोचावे लागले. या मोहिमेत परंडा तालुक्यात मात्र एकाही बालविवाहाची नोंद झाली नसल्याची बातमी समोर आली आहे. ही मोहीम केवळ कारवाईपुरती मर्यादित न राहता सामाजिक जनजागृतीची व्यापक चळवळ बनणे आवश्यक आहे. कोवळ्या हातांवर मेहंदी नव्हे, तर शिक्षणाची शाई लागावी, यासाठी आता समाजानेही पुढे येण्याची गरज व्यक्त होत आहे. बालविवाहाची माहिती मिळताच नागरिकांनी तात्काळ चाईल्ड हेल्पलाइन १०९८, पोलीस मदत क्रमांक ११२ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवली जाते.बालविवाहाचा थेट परिणाम मुलींच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि भविष्यातील संधींवर होतो. लहान वयात लग्न झाल्यास मुलीचे शिक्षण अर्धवट थांबते. अल्पवयीन मातृत्वाचा धोका वाढतो. कुपोषण आणि आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. त्यामुळे बालविवाह हा केवळ सामाजिक विषय नसून मुलींच्या सर्वांगीण विकासाशी निगडित गंभीर प्रश्न आहे.

### २० एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान रोखलेले बालविवाह

धाराशिव – ६
तुळजापूर – ४
लोहारा – ३
उमरगा – ५
भूम – ५
कळंब – २
वाशी – १
परांडा – ०
एकूण – २६

### दोन प्रकरणात मुलींनीच दिली माहिती

यातील दोन प्रकरणांमध्ये स्वतः मुलींनीच प्रशासनाला माहिती देऊन बालविवाह रोखण्याची विनंती केली होती. मुलींना शिकायचे आहे परंतु आई वडील कोवळ्या वयात लग्न लाऊन देत असल्याची माहिती मुलींनी अगोदरच दिल्यामुळे प्रशासनाने हे दोन्ही विवाह वेळेत जाऊन रोखले. यातील एक मुलगी धाराशिव तालुक्यातील दुसरी मुलगी उमरगा तालुक्यातील आहे.

### ...तर यांच्यावरही होणार कारवाई

बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार बालविवाह लावणे हा गंभीर गुन्हा असून अशा प्रकरणात केवळ पालकांवरच नव्हे तर विवाह लावणारे मध्यस्थ, नातेवाईक, मंडप डेकोरेशन व्यावसायिक, बँडपथक, भोजन व्यवस्था पुरवठादार तसेच धार्मिक विधी पार पाडणाऱ्यांवरही कारवाईची तरतूद आहे.

### बालविवाह ही सामाजिक समस्या आहे

ग्रामबाल संरक्षण समिती, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, शिक्षक, पोलीस पाटील आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून तात्काळ माहिती देणे आवश्यक आहे. बालविवाह ही सामाजिक समस्या आहे त्यामुळे पालकांनी बालविवाह करू नये. २६ बालविवाह रोखले असले तरी हे होऊच नये यासाठी व्यापक जनचळवळ गरजेची बनली आहे.

**किशोर गोरे**
**महिला व बालविकास अधिकारी.**

## चुलत बहिणीच्या लग्नात नाचल्याच्या कारणावरून तरुणावर कोयत्याने हल्ला



आरंभ मराठी । परंडा

परंडा तालुक्यातील सरणवाडी येथे चुलत बहिणीच्या लग्नात नाचल्याच्या किरकोळ कारणावरून एका तरुणास शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व लोखंडी कोयत्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल अर्जुन साबळे, वैभव लक्ष्मण जाधव, गणेश लक्ष्मण जाधव व लक्ष्मण धर्मा जाधव (सर्व रा. सरणवाडी ता. परंडा) यांनी दिनांक १३ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास सूर्यकांत कदम यांच्या घराजवळ फिर्यादी दिपक भारत जाधव (वय ३०, रा. सरणवाडी) यांना अडवून "तू तुझ्या चुलत बहिणीच्या लग्नात सगळ्यांसमोर का नाचत होतास?" असा जाब विचारत शिवीगाळ केली. यानंतर आरोपींनी दिपक जाधव यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच लोखंडी कोयत्याने हल्ला करून गंभीर जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी दिपक जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## युवकांच्या पुढाकारातून क्रांतिवीर फकिरा चौकाचे सुशोभीकरण

आरंभ मराठी । धाराशिव



वैराग नाका येथील फकिरा नगर परिसरातील युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत क्रांतिवीर फकिरा चौकाचे आकर्षक सुशोभीकरण करून प्रेरणादायी उपक्रम राबविला. सर्व समाज बांधवांच्या सहभागातून आणि स्वखर्चातून करण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे. युवकांनी चौकाचे नूतनीकरण करत "क्रांतिवीर फकिरा चौक" असा डिजिटल बोर्डही बसविला. उद्घाटन माजी नगरसेवक दत्ता पेठे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी अशोक पेठे, अहमद भाई कुरेशी, रॉबिन बगाडे, सुमेध क्षिरसागर, बाळासाहेब कांबळे, अंकुश पेठे आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर फटाक्यांची आतषबाजी, डीजेवर महापुरुषांची गीते आणि जल्लोषपूर्ण वातावरणात कार्यक्रम साजरा करण्यात आला. युवकांच्या या उपक्रमामुळे महापुरुषांचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यास हातभार लागल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## जनगणना-२०२७ साठी घर सूचीकरण मोहिमेला सुरुवात

### नागरिकांनी सहकार्य करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन



**धाराशिवः-** जनगणना-२०२७ अंतर्गत घर सूचीकरण (House Listing) प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले आहे. जनगणना प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणकांकडून नागरिकांच्या घर सूचीकरणाची आवश्यक नोंद करण्यात येणार आहे. काही कारणास्तव १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणना (Self Enumeration) करता न आलेल्या नागरिकांसाठी आता १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त प्रगणक घरभेटी देऊन माहिती संकलित करणार आहेत.या प्रक्रियेदरम्यान नागरिकांना शासनाने निश्चित केलेल्या जनगणनेशी संबंधित ३३ प्रश्नांची माहिती द्यावी लागणार आहे. या माहितीच्या आधारे संबंधित नागरिकांची नोंद जनगणनेच्या अधिकृत पोर्टलवर करण्यात येणार आहे.घर सूचीकरण प्रक्रियेत इमारत व घर क्रमांक, घराचे स्थान, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग, प्रवर्ग, राहण्याच्या खोल्यांची संख्या, विवाहित जोडप्यांची संख्या तसेच घरातील उपलब्ध सुविधा, मालमत्ता व साहित्य यासंदर्भातील माहिती विचारण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात पार पडणार असून नागरिकांनी दिलेली माहिती पूर्णपणे गोपनीय आणि सुरक्षित ठेवली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्यात धाराशिव जिल्ह्याने राज्यात अग्रस्थानी राहावे, यासाठी सर्व नागरिकांनी नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती देऊन राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

**आरंभ मराठी** — एकाच छताखाली १ हजार २९८ नागरिकांनी घेतला शासकीय सेवांचा लाभ

## धाराशिवमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराला' उत्स्फूर्त प्रतिसाद

आरंभ मराठी । धाराशिव



शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महसूल विभागाच्या वतीने धाराशिव मंडळाचे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले होते. धाराशिव शहरातील परिमल मंगल कार्यालय येथे पार पडलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध दाखले, प्रमाणपत्रे तसेच महसूल विभागाशी संबंधित अनेक कामे तत्काळ पूर्ण झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.शिबिराचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष नेहा काकडे, तहसीलदार डॉ. मृणाल जाधव, मुख्याधिकारी नीता अंधारे, नायब तहसीलदार घृष्णेश्वर स्वामी, महादेव शिंदे, विशाखा बलकवडे तसेच तालुका कृषी अधिकारी राहुल दिवाने यांच्यासह मंडळ अधिकारी आणि तलाठी उपस्थित होते. या शिबिरात तब्बल १ हजार २९८ नागरिकांनी सहभाग नोंदवून विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला. महसूल, कृषी, ग्रामविकास, आरोग्य, महिला व बालविकास, भूमी अभिलेख, पुरवठा, एसटी महामंडळ, उमेद आणि समाजकल्याण विभागांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. नागरिकांच्या विविध अडचणी आणि प्रलंबित कामांचे तात्काळ निराकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला. तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येक नागरिकाची वैयक्तिक भेट घेत त्यांच्या समस्या समजून घेतल्या व संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाहीच्या सूचना दिल्या. महसूल विभागामार्फत १४५ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच १८५ डिजिटल ७/१२ उतारे आणि १८५ आठ-अ उतारे उपलब्ध करून देण्यात आले. विविध प्रकारची २८२ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून त्यामध्ये ९७ जात प्रमाणपत्रे, १०१ उत्पन्न प्रमाणपत्रे, ३५ रहिवासी प्रमाणपत्रे आणि १६ नॉन क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचा समावेश होता. एक खिडकी योजनेअंतर्गत पीएम किसान, महिला व बालविकास, ग्रामविकास, आरोग्य विभाग आदी योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज स्वीकारण्यात आले. महिला व बालविकास विभागाच्या 'लाडकी बहीण' योजनेसाठी ११४ लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रामविकास विभागाकडे ८४ अर्ज, आरोग्य विभागाकडे ४५ अर्ज तर पीएम किसान योजनेसाठी २० अर्ज प्राप्त झाले. शिबिरात रेशनकार्ड दुरुस्ती व नवीन रेशनकार्डसाठी सर्वाधिक ३६३ अर्ज प्राप्त झाले. याशिवाय ६९ शिधापत्रिका, २८ संजय गांधी योजना लाभ, १६ आयुष्यमान कार्ड सेवा तसेच २७ मतदार नोंदणी व दुरुस्ती प्रकरणे मार्गी लावण्यात आली. नागरिकांना विविध योजनांची माहिती देण्यासाठी माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. तसेच विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. प्रलंबित तक्रारींचा आढावा घेऊन त्यांचे निराकरण करण्यावर भर देण्यात आल्याची माहिती तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी दिली.




# सादगीपूर्ण जीवनशैली आणि आर्थिक राष्ट्रभक्ती

**किशोर जाधव,**
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१



पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी हैदराबाद येथील जाहीर सभेत आंतरराष्ट्रीय संघर्षाच्या काळात देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी "आर्थिक देशभक्ती" (Economic Patriotism) चे आवाहन केले आहे. परकीय चलन वाचवण्यासाठी नागरिकांनी पुढील एक वर्ष अनावश्यक खर्च टाळावा, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक भारतीयाने "आर्थिक योद्धा" बनावे, असे परखड मतही त्यांनी व्यक्त केले.

परकीय चलनाची बचत करण्यासाठी त्यांनी पुढील पंचसूत्री मांडली आहे —१) इंधन बचतीसाठी जीवनशैलीत बदल-

वाढत्या पेट्रोल-डिझेल आयातीवरील खर्च कमी करण्यासाठी पंतप्रधानांनी काही व्यावहारिक उपाय सुचवले आहेत. शक्य असेल तिथे मेट्रो किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, खासगी वाहने वापरताना "कार-पूलिंग" करावे आणि जास्तीत जास्त इलेक्ट्रिक वाहनांकडे (EV) वळावे. उद्योजकांनी मालवाहतुकीसाठी रस्त्याऐवजी रेल्वेचा वापर करावा, जेणेकरून इंधनाची मोठी बचत होईल.

२) सोन्याची खरेदी आणि परदेशी सहलींना लगाम - भारताचा परकीय चलनसाठा वाचवण्यासाठी पंतप्रधानांनी महत्त्वाची विनंती केली आहे — "पुढील एक वर्ष सोन्याची अनावश्यक खरेदी टाळा." यासोबतच, लग्नासाठी परदेशात जाण्याऐवजी "वेड इन इंडिया" मोहिमेला पाठबळ द्यावे आणि सुट्ट्यांसाठी परदेशाऐवजी देशांतर्गत पर्यटनाला प्राधान्य द्यावे, जेणेकरून पैसा देशातच राहील.

३) 'वर्क फ्रॉम होम' आणि स्वदेशी वस्तूंचा वापर - जिथे शक्य आहे तिथे "वर्क फ्रॉम होम" आणि व्हर्च्युअल मीटिंग्स सुरू कराव्यात, असे पंतप्रधानांनी सुचवले. यामुळे वाहतुकीचा खर्च आणि वेळ दोन्ही वाचतील. तसेच, दैनंदिन वापरातील जास्तीत जास्त वस्तू "मेक इन इंडिया" अंतर्गत तयार झालेल्या वापराव्यात.

४) शेतीतील रासायनिक खतांचा वापर कमी करा - रासायनिक खतांचा वापर ५० टक्क्यांनी कमी करून नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे आवाहन त्यांनी केले. यामुळे रासायनिक खतांची आयात कमी होईल आणि परकीय चलनाची बचत होईल.

५) खाद्यतेलाचा मर्यादित वापर करा - रोजच्या आहारात खाद्यतेलाचा वापर मर्यादित ठेवण्याचा सल्ला पंतप्रधानांनी दिला आहे. यामुळे आरोग्य सुधारेल आणि तेलाची आयातही कमी होईल. परिणामी, परकीय चलनाची बचत होईल.

वरील सर्व उपाय सकारात्मकतेने स्वीकारले, तर त्यातून व्यक्तीचाही आणि देशाचाही फायदा होईल हे स्पष्ट दिसते. "सरकारचे धोरण फसले आहे म्हणून अशा प्रकारचे आवाहन केले जात आहे" असा राजकीय दृष्टिकोन न ठेवता, "ही सादगीपूर्ण जीवन जगण्याची संधी आहे" असा सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यात काहीच हरकत नाही.

दरवर्षी भारत सुमारे ८०० टन सोने आयात करतो, तर देशांतर्गत उत्पादन केवळ एक टनाच्या आसपास आहे. यासाठी सुमारे ७२ अब्ज डॉलर इतका प्रचंड पैसा परदेशात जातो. सोन्याची हौस ही प्रामुख्याने श्रीमंत वर्गाची असते; मात्र तिचा आर्थिक परिणाम संपूर्ण समाजावर होतो. हा पैसा गरीबांसाठीच्या कल्याणकारी योजनांवर किंवा रोजगारनिर्मितीसाठी वापरला जाऊ शकतो. संपत्तीचे फेरवाटप होऊन समाजवादी समाजरचना निर्माण होण्यासही त्यातून मदत होऊ शकते.

अर्थात, या धोरणाचा सुवर्णउद्योगाला फटका बसू शकतो, हेही लक्षात घेतले पाहिजे. सोने हा भारतीयांच्या श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक जीवनाशी निगडित विषय आहे. विविध मुहूर्तांवर सुवर्णखरेदी करणे ही परंपरा आपल्या संस्कृतीशी जोडलेली आहे. स्त्रीधन आणि विवाहानिमित्त होणारी सुवर्णखरेदी जिव्हाळ्याने केली जाते. आजही भारतातील अनेक मोठ्या देवस्थानांच्या दक्षिणापेटीत श्रद्धेने सोने दान केले जाते. त्यामुळे भारतीयांची सोन्याची खरेदी एका दिवसात कमी होणार नाही, हे वास्तव आहे.

सादगीपूर्ण जीवनाचा विचार आपल्या महान संतपरंपरेपासून ते राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्यापर्यंत अनेकांनी मांडला आहे. कारण धनसंपत्तीच्या मागे आयुष्यभर धावणाऱ्याच्या हाती शेवटी काहीच लागत नाही. खरे सुख आणि आध्यात्मिक समाधान हे अंगावरील सुवर्णामुळे नव्हे, तर आपल्या कृतीमुळे इतरांच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या हास्य, प्रसन्नता आणि प्रेमभावातून मिळते.

भारत दरवर्षी सुमारे १३० ते १५० अब्ज अमेरिकन डॉलर किमतीचे कच्चे तेल आणि इंधन आयात करतो. देशाच्या एकूण आयात खर्चापैकी सुमारे १७ ते १८ टक्के रक्कम केवळ इंधन आयातीवर खर्च होते. पश्चिम आशियातील युद्धामुळे तेल कंपन्यांना वाढलेल्या किमतींमुळे मोठा आर्थिक फटका बसत आहे.

भविष्यात देशावर मोठे आर्थिक संकट येऊ नये, यासाठी इंधन बचतीचे उपाय अवलंबणे आवश्यक आहे. अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढवला पाहिजे.

सार्वजनिक वाहतुकीच्या वापरातून सादगीचे प्रकटीकरण होते. बस आणि रेल्वे प्रवासामुळे समाजातील विविध घटकांशी स्नेहसंबंध वाढतात. वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होते. म्हणून सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

भारत दरवर्षी १४ ते १८ अब्ज अमेरिकन डॉलर किमतीची रासायनिक खते आणि त्यांचा कच्चा माल आयात करतो. रासायनिक खतांचा वापर कमी केल्याने जमिनीचा पोत सुधारतो. अन्नातील विषारी घटकांचे प्रमाण कमी होऊन कर्करोगासारख्या आजारांचे प्रमाणही कमी होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे आवाहन सकारात्मकतेने स्वीकारले पाहिजे.

खाद्यतेलासाठी लागणारे पामतेल भारत मोठ्या प्रमाणावर आयात करतो. दरवर्षी ८ ते १० अब्ज अमेरिकन डॉलर किमतीचे पामतेल परदेशातून आणले जाते. भारत हा जगातील सर्वात मोठा पामतेल आयातदार देश आहे. पंतप्रधानांच्या आवाहनाचा अर्थ "तेल खाणे बंद करा" असा नसून, "तेलाचा संयमित वापर करा" असा आहे. प्रत्येक प्रौढ व्यक्तीस दरमहा साधारण अर्धा लिटर तेल पुरेसे मानले जाते.

तळलेले पदार्थ हे मुख्यतः जिभेचे चोचले पुरवण्यासाठी खाल्ले जातात.

त्यावर नियंत्रण ठेवले, तर मोठ्या प्रमाणात खाद्यतेलाची बचत होऊ शकते. अतिरिक्त तेलामुळे शरीरात चरबी वाढते आणि रक्तदाब, हृदयरोग यांसारखे आजार वाढतात. त्यामुळे तेलाच्या वापरावर नियंत्रण ठेवल्यास वैयक्तिक आरोग्यासोबतच देशाचे आर्थिक आरोग्यही मजबूत होईल.

देशहितामध्येच आपले हित सामावलेले असते, हे आपण विसरता कामा नये.

देशावर संकट आले, की भारतीय जनतेने नेहमीच सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. लाल बहादूर शास्त्री यांनी "जय जवान, जय किसान"चा नारा दिल्यानंतर अनेक तरुण सैन्यात दाखल झाले होते . स्वर्गीय राजीव गांधी यांनी तंत्रज्ञानात स्वयंपूर्णतेचे आवाहन केल्यानंतर भारतीय तरुणांनी संशोधन क्षेत्रात स्वतःला झोकून दिले आणि स्वदेशी संगणकनिर्मितीचा मार्ग खुला केला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे आवाहन म्हणजे केवळ आर्थिक धोरण नव्हे, तर सादगीपूर्ण, संयमी आणि राष्ट्रहित जपणारी जीवनशैली स्वीकारण्याची एक मोठी संधी आहे.

# अणदूरमध्ये श्रीशैल महापीठ जगद्गुरुंचे भव्य स्वागत; शिवकथेला महिलांची प्रचंड गर्दी






**आरंभ मराठी । अणदूर**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे श्री नीलकंठेश्वर संस्थान मठाच्या वतीने धार्मिक वातावरणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने श्री प्रभुलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या शतक जन्मोत्सव महोत्सव, श्री शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पट्टाभिषेक रौप्यमहोत्सव तसेच महास्वामीजींच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त त्रिवेणी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी श्रीशैल महापीठाचे



जगद्गुरु, श्री श्री 1008 सूर्य सिंहासनाधीश्वर डॉ. चन्नसिद्धाराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांचे अणदूर येथे आगमन झाले असता त्यांचे अड्डपालखी सोहळ्यातून भव्य स्वागत करण्यात आले. खंडोबा मंदिर ते कार्यक्रम स्थळ अशी सवाद्य कुंभ मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत शेकडो महिला कलश घेऊन सहभागी झाल्या होत्या, तर बँड, ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. जगद्गुरूंच्या पावन पदस्पर्शाने अणदूर नगरी पावन झाल्याची भावना भक्तांमध्ये व्यक्त होत होती. कार्यक्रमस्थळी मान्यवरांच्या हस्ते जगद्गुरूंचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी विविध मठांचे मठाधिपती तसेच प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते. कपिलधार महास्वामीनी यांनी उपस्थितांना आशीर्वचन दिले. दरम्यान, १३ मे पासून सुरू असलेल्या श्री हरिहरानंद भारती स्वामी यांच्या शिवकथेचा लाभ घेण्यासाठी अणदूर व परिसरातील हजारो महिला स्व. सी. ना. आलुरे गुरुजी सभामंडपात मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. या शिवकथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दररोज महाप्रसादाचेही भव्य आयोजन करण्यात येत आहे. संपूर्ण अणदूर परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला असून, या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ अधिकाधिक भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शिवसेनेच्या पाठपुराव्याला यश

## तुळजापूरातील अतिरिक्त पार्किंग वसुली झाली बंद

**आरंभ मराठी । तुळजापूर**

श्री तुळजाभवानी मंदिर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांकडून पार्किंगच्या नावाखाली सुरू असलेली अतिरिक्त वसुली अखेर प्रशासनाने तात्काळ बंद केली असून, या प्रकरणात शिवसेना पक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून या प्रश्नावर शिवसेना शहर उपप्रमुख रमेश चिवचिवे यांनी प्रशासनाकडे वारंवार निवेदने देत भाविकांची आर्थिक लूट थांबविण्याची मागणी केली होती. श्री तुळजाभवानी मंदिर दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांच्या वाहनांसाठी पार्किंग शुल्क म्हणून गुत्तेदाराकडून प्रति गाडी ७० रुपये आकारले जात होते. मात्र शासन नियमांनुसार हे शुल्क ५० रुपये असताना अतिरिक्त २० रुपये आकारले जात असल्याच्या तक्रारी भाविकांकडून सातत्याने करण्यात येत होत्या. या पार्श्वभूमीवर शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देत अतिरिक्त वसुली तात्काळ बंद करण्याची मागणी केली होती. शिवसेनेच्या आंदोलनात्मक भूमिकेनंतर प्रशासनाने संबंधित गुत्तेदारांना आदेश दिले असून, आजपासून पार्किंगसाठी शासनमान्य ५० रुपये शुल्क आकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, शिवसेना पक्षाच्या भूमिकेचे स्वागत करण्यात येत आहे.या आंदोलनात तुळजापूर तालुकाप्रमुख अमोल जाधव, शहर संघटक नितीन मस्के, शहर प्रमुख बापूसाहेब भोसले यांच्यासह जय अंबिका तरुण मंडळाचे सदस्य विलास कदम, बंटी कदम, अनिकेत बर्वे, समर्थ सांळुखे, विक्रम कदम, आनंद कदम, किरण लोंढे, अमोल लोंढे, प्रशांत मुकेरकर, नाना पेंदे, विशाल कदम तसेच अनेक शिवसैनिक व सभासदांनी सक्रिय सहभाग घेतला. या सर्वांचे रमेश चिवचिवे यांनी आभार मानले. दरम्यान, मागील दोन ते तीन महिन्यांपासून अतिरिक्त २० रुपये कोणाच्या आदेशावरून वसूल करण्यात येत होते, यामध्ये कोणते अधिकारी किंवा कर्मचारी सहभागी होते का, याची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच भाविकांकडून घेतलेली अतिरिक्त रक्कम संबंधित गुत्तेदाराकडून वसूल करून दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा येत्या काळात शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रमेश चिवचिवे यांनी दिला आहे.

# मराठा समाज मंदिरासाठी जागा तातडीने निश्चित करून विकासकामांना गती देण्याच्या पालकमंत्री सरनाईक यांच्या सूचना

## २० विद्यार्थी जाणार नासा अंतराळ संशोधन संस्थेत

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथे मराठा समाज मंदिरासाठी जागा निश्चित करण्यात यावी. जागा निश्चित झाल्याबाबतचा अहवाल पुढील आठवड्यात सादर करावा तसेच जिल्ह्यातील विकास कामांना गती देण्याचे निर्देश पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी (दि.१५) दिले. जिल्ह्यातील विविध विकासकामे, समित्यांच्या नियुक्त्या, अतिवृष्टीग्रस्त कामांची प्रगती, विद्यार्थ्यांच्या नासा अभ्यास दौऱ्याची निवड प्रक्रिया तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या विविध प्रश्नांबाबत पालकमंत्र्यांनी मंत्रालयातील त्यांच्या दालनातून दूरदृष्यप्रणालीद्वारे विविध विषयांचा आढावा घेत प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. पालकमंत्री अध्यक्ष असलेल्या विविध समित्यांच्या तसेच विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही पालकमंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले. जिल्ह्यात विविध तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कामांच्या प्रगतीचाही



त्यांनी सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्यातील २० विद्यार्थ्यांना अमेरिकेतील नासा अंतराळ संशोधन संस्थेत अभ्यास दौऱ्यासाठी पाठविण्याच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया जुलै महिन्यात पूर्ण करण्यात यावी,असेही त्यांनी सांगितले. वाहतूक नियमांविषयी विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी तसेच अपघातांचे प्रमाण कमी व्हावे, यासाठी धाराशिव येथे 'धर्मवीर आनंद दिघे ट्रॅफिक पार्क' उभारण्यासाठी जागा निश्चित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तुळजापूर येथे प्राणी संग्रहालय उभारण्यासाठी आवश्यक जागा निश्चित करून वन विभागाने पाठपुरावा करावा,असे निर्देश देतानाच नगरपालिका क्षेत्रात मृत पाळीव जनावरांच्या अंत्यसंस्कारासाठी जागा निश्चित करण्यास सांगितले. पाळीव प्राण्यांच्या दहनभूमीसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल,असेही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी नमूद केले. यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी धाराशिव येथे मराठा समाज मंदिरासाठी लवकरच जागेची निवड करण्यात येईल, अशी माहिती दिली. विविध समित्यांच्या नियुक्त्यांसंदर्भातही कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या दुरुस्तीसाठी रस्ते, पूल, सिंचन प्रकल्प आणि बंधाऱ्यांच्या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जलसंधारण विभागाला १६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहितीही पुजार यांनी दिली. तसेच प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात पाळीव जनावरांच्या अंत्यसंस्कारासाठी पाच गुंठे जागा राखीव ठेवण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता व्ही. एम.भंडे, कार्यकारी अभियंता शिवराम केत, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रभाकर महामुनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर,नगरपालिका प्रशासन उपायुक्त त्र्यंबक ढेंगळे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# शिवसेनेकडून सुरज साळुंके यांच्यावर धाराशिव लोकसभा सहसंपर्कप्रमुखपदाची जबाबदारी

## नव्या जोमाने पक्ष संघटन आणखी मजबूत करणार असल्याची साळुंके यांची ग्वाही

**आरंभ मराठी । धाराशिव**

शिवसेनेचे सुरज राजाभाऊ साळुंके यांच्यावर पक्षाने नवी जबाबदारी सोपवली आहे. शिवसेनेच्या धाराशिव लोकसभा प्रभारी सहसंपर्कप्रमुखपदी त्यांची निवड करण्यात आली असून पक्षाचे सचिव संजय मोरे यांनी नियुक्तीचे पत्र साळुंके यांना दिले. निवडीनंतर शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव लोकसभा मतदारसंघात नव्या जोमाने पक्ष संघटन आणखी मजबूत करणार असल्याचे नूतन प्रभारी सहसंपर्कप्रमुख सूरज साळुंके यांनी सांगितले. मुंबई येथे शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते शिवसेना धाराशिव लोकसभा प्रभारी सहसंपर्कप्रमुखपदी नियुक्तीचे पत्र देण्यात आले. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.श्री. एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या धाराशिव लोकसभा प्रभारी सह संपर्कप्रमुखपदी



आपली नियुक्ती करण्यात येत असून नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असेल, असे नियुक्ती पत्रात म्हटले आहे. सुरज साळुंके यांनी धाराशिव जिल्हाप्रमुख पदावर काम करत असताना धाराशिव - कळंब विधानसभा मतदार संघात शिवसेनेचे संघटन मोठ्या प्रमाणात वाढविलेले आहे. जुन्या आणि नव्या शिवसैनिकांमध्ये समन्वय साधून त्यांनी युवा सैनिकांची मोठी फळी उभी केली आहे. त्यांच्यावर आता नवी जबाबदारी सोपवली असल्याने धाराशिव लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे संघटन आणखी बळकट होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
पुणे कार्यालय:1012,विंग B, पूर्वांचल,वेबग्योर स्कूलशेजारी, वाघोली,पुणे.

# अंधत्वावर मात करत राहुल लाकाळने उभा केला स्वाभिमानाचा व्यवसाय

## डोळ्यांनी दिसत नसले तरी जिद्दीच्या जोरावर उजळले आयुष्य; पळसपच्या राहुलची प्रेरणादायी वाटचाल

रमेश नरवडे । आरंभ मराठी

**पळसप - डोळ्यांनी जग दिसत नसले तरी जिद्द, आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर आयुष्य उजळवता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे पळसप येथील ३० वर्षीय युवक राहुल सर्जेराव लाकाळ. अंधत्वासारख्या मोठ्या अडथळ्यावर मात करत राहुलने गावात स्वतःचे आइस्क्रीम दुकान सुरू केले असून तो हा व्यवसाय अत्यंत आत्मविश्वासाने आणि सुरळीतपणे चालवत आहे.**



लहानपणापासूनच दृष्टी नसतानाही राहुलने कधीही हार मानली नाही. वडिलांचे छत्र नसतानाही त्याने परिस्थितीशी दोन हात करत स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा निर्धार केला. आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ त्याने सुरू केलेल्या 'आप्पा कोल्ड्रिंक्स अँड आइस्क्रीम शॉप' या व्यवसायाला आज गावातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. गावातील मुख्य ठिकाणी असलेल्या त्याच्या दुकानात विविध प्रकारचे आइस्क्रीम, कोन, कुल्फी आणि कोल्ड्रिंक्स उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे, १०० टक्के अंधत्व असतानाही राहुल ग्राहकांना अचूक सेवा देतो. पैशांचा हिशोब, व्यवहार तसेच मालाची खरेदी यासारखी जबाबदारी तो अत्यंत नेमकेपणाने सांभाळतो.राहुलचा आत्मविश्वास आणि काम करण्याची पद्धत पाहून ग्राहकही त्याचे मनापासून कौतुक करतात. अंध असूनही तो इतक्या अचूकपणे व्यवहार करतो, हे पाहून आश्चर्य वाटते, अशी भावना अनेक ग्रामस्थ व्यक्त करतात. दुकानात येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला तो नम्रतेने सेवा देतो, त्यामुळे त्याचा व्यवसाय दिवसेंदिवस वाढत आहे. अडचणींचा डोंगर असतानाही राहुलने जिद्दीने उभा केलेला हा व्यवसाय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील तरुणांसाठी त्याची कथा एक मोठा संदेश देणारी आहे. आज अनेक तरुण शारीरिकदृष्ट्या सक्षम असूनही कामधंदा करण्यास टाळाटाळ करतात; अशा वेळी राहुलची जिद्द आणि मेहनत नक्कीच मार्गदर्शक ठरते. परिस्थिती कशीही असली तरी चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वास असेल तर यश नक्की मिळते, हे राहुलने आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे. स्वतःवरील विश्वास आणि प्रामाणिक मेहनतीच्या जोरावर जीवनात कोणतीही अडचण पार करता येते, हे त्याच्या संघर्षमय प्रवासातून दिसून येते.

### कोणाच्याही मदतीशिवाय चालवतो व्यवसाय

राहुलची जिद्द पाहून आम्हालाही प्रेरणा मिळते. तो कोणाच्याही मदतीशिवाय स्वतःचा व्यवसाय करत आहे, हे खूप मोठं आहे. या परिस्थितीतही तो हसतमुखाने काम करतो, हे पाहून त्याच्याबद्दल खूप आदर वाटतो. इतर तरुणांनी त्याच्याकडून शिकायला हवं. न्यूनतेवर मात करून तो आत्मविश्वासाने व्यवसाय करत आहे.

**श्रीरंग तावरे**
**ग्रामस्थ, पळसप.**

### तरुणांसाठी आदर्श उदाहरण

आजच्या काळात अनेक तरुण शारीरिकदृष्ट्या सक्षम असूनही कुटुंबाच्या आधारावर जीवन जगतात. अनेकांकडे संधी असूनही ते प्रयत्न करण्यास मागे पडतात, तर काहीजण परिस्थितीला दोष देत बसतात. मात्र राहुलसारखा युवक, जो पूर्णपणे अंध असूनही स्वतःचा व्यवसाय उभा करतो, तो अशा तरुणांसाठी एक प्रेरणादायी संदेश देतो. अंधत्वावर मात करत जीवनात स्वावलंबनाचा प्रकाश आणणाऱ्या राहुलची गोष्ट सर्वांसाठीच प्रेरणादायी ठरत आहे.

# बाळ पाटील यांना श्रीसंत गोरोबाकाका सेवा पुरस्कार



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिवचे प्रसिद्ध गझलकार श्री.बाळ पाटील यांना श्रीक्षेत्र तेर येथे 'श्रीसंत गोरोबाकाका सेवा मंडळ ट्रस्ट च्या. वतीने त्यांच्या आध्यात्मिक कार्याबद्दल 'श्रीसंत गोरोबाकाका सेवा पुरस्कार' काकांच्या वाड्यात श्रीसंत गोरोबाकाका सेवा मंडळ ट्रस्टच्या वतीने प्रदान करण्यात आला.यावेळी ह.भ.प.श्री.ईश्वर महाराज कुंभार व तेर परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या या यशाबद्दल डॉ.रुपेशकुमार जावळे व मित्र परिवारांनी त्यांचे कौतुक केले.

# छत्रपती संभाजी महाराजांना कळंबमध्ये संभाजी ब्रिगेडचे अभिवादन

आरंभ मराठी । कळंब

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त कळंब येथे संभाजी ब्रिगेडच्या वतीने गुरुवारी (दि.१४) छत्रपती शिवाजी महाराज चौकात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संभाजी ब्रिगेड व मराठा सेवा संघाच्या वतीने ध्वजारोहण, प्रतिमापूजन व सामूहिक अभिवादन करण्यात आले. तसेच कॉ. गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाचे वाटप उपस्थितांना करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेड मराठवाडा संघटक अतुल गायकवाड, जगदीश गवळी, अशोक चोंदे, तानाजी चौधरी, शिवाजी गीड्डे, अनिल यादव, राजेंद्र बिक्कड, प्रकाश धस, आबासाहेब मराठे, डेंगळे, भारत जाधव, महादेव सुतार, महेश कोळपे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवशंभू प्रेमी उपस्थित होते.

# संभाजी महाराज जयंतीनिमित्त रोटरी क्लबचा आरोग्य उपक्रम; १२५ जणांची मोफत रक्त तपासणी

आरंभ मराठी । धाराशिव

छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधत रोटरी क्लब ऑफ धाराशिव आणि नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्रमांक २, रामनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास रोटरियन सदस्य तसेच त्यांच्या कुटुंबीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रामनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व न. प. शाळा क्रमांक २४ येथे पार पडलेल्या या शिबिरात तब्बल १२५ जणांनी सहभाग नोंदवत विविध रक्त तपासण्या करून घेतल्या. विशेष म्हणजे, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तपासणी व टेस्टसाठी नागरिकांचा वाढता कल या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाला. सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष लक्षात घेऊन रोटरी क्लब ऑफ धाराशिवच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

शिबिरामध्ये सीबीसी काउंट, लिव्हर फंक्शन टेस्ट, किडनी फंक्शन टेस्ट, लिपिड प्रोफाइल, थायरॉईड टेस्ट, इलेक्ट्रोलाईट टेस्ट, HbA1c तसेच शुगर फास्टिंग आणि पीपी अशा विविध रक्त





तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात आल्या. सकाळपासूनच सहभागींची मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली. या उपक्रमास रोटरी क्लब ऑफ धाराशिवचे अध्यक्ष रणजीत रणदिवे, सचिव प्रदीप खामकर तसेच रोटरी सेवा ट्रस्टचे सचिव प्रवीण काळे, सदस्य सुनील गर्जे, चित्रसेन राजेनिंबाळकर, पी. के. मुंडे यांनी उपस्थित राहून शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला. तसेच संजय चव्हाण, चंदन भडंगे, अमोल माने, गिरीश आस्टगी, अभिजित पवार, अभिजित पाटील, सूरज कदम यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नील आकोसकर, डॉ. अनुराधा लोखंडे, औषध निर्माता चेतन दुबे, स्टाफ नर्स माया राठोड, तहसीन शेख तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ अर्चना शिंदे आणि स्वराज सूर्यवंशी यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी मोलाचे सहकार्य केले. शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांनी रोटरी क्लबच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. समाजामध्ये नियमित आरोग्य तपासणीबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि नागरिकांनी आरोग्याबाबत सजग राहावे, या उद्देशाने भविष्यातही असे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# सलग तीन अपयशांवर मात करत येडशीच्या मानसी इंगळेची एम्समध्ये 'नर्सिंग ऑफिसर' पदाला गवसणी

आरंभ मराठी । येडशी

जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर येडशी येथील मानसी गोपाळ इंगळे हिने प्रतिष्ठेच्या एम्समध्ये 'नर्सिंग ऑफिसर' पदाला गवसणी घालत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सलग तीन वेळा अपयश आल्यानंतरही हार न मानता तिने 'सेल्फ स्टडी'च्या माध्यमातून यश मिळवत अनेक विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. मानसीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, येडशी येथे झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण पी.ई.एस. मॉडर्न हायस्कूल, पुणे येथे पूर्ण केले. उच्च माध्यमिक व पदवी शिक्षण हंसी एस. मॉडर्न कॉलेज, पुणे तसेच रुबी हॉल नर्सिंग कॉलेज, पुणे येथे झाले. पदवीनंतर तिने डी. वाय. पाटील हॉस्पिटल, पुणे येथे एक वर्ष नोकरी केली. पुढे पोस्ट ग्रॅज्युएट शिक्षण डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, पुणे येथे पूर्ण केले. माजी सैनिक गोपाळ इंगळे व शिक्षिका नंदा इंगळे यांची कन्या असलेल्या मानसीने कोणतेही बाह्य क्लासेस न लावता स्वतःच्या अभ्यासावर भर दिला. 'नर्सिंग ऑफिसर रिक्रूटमेंट कॉमन एलिजिबिलिटी टेस्ट'मध्ये तिने देशपातळीवर ७६३ वा क्रमांक मिळवला आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### अपयशाने खचून न जाता जिद्दीने अभ्यास केला

आई प्राथमिक शिक्षिका असल्याने मला प्रत्येक टप्प्यावर तिचे मार्गदर्शन मिळाले. कॉलेज आणि एम.एस्सी.चे शिक्षण सांभाळत दररोज ८ ते १० तास सेल्फ स्टडी करत होते. सलग तीन वेळा अपयश आले, पण हार मानली नाही. अपयशावर मात करण्याची जिद्द कायम ठेवली.

**मानसी इंगळे.**

# विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे राष्ट्रीय संयोजक किशन प्रजापत यांची सदिच्छा भेट

**तुळजापूर** :- विश्व हिंदू परिषद व बजरंग दलचे राष्ट्रीय संयोजक किशनजी प्रजापत यांनी तुळजापूर येथील रुपामाता अर्बन को-ऑपरेटिव्ह व रुपामाता परिवार फाऊंडेशन कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष तथा रुपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक ॲड. अजित गुंड पाटील, जिल्हा महामंत्री विजयराव वाघमारे व जिल्हा संयोजक राजकुमार गाढवे यांच्या हस्ते त्यांचा आई तुळजाभवानीची प्रतिमा भेट




देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी विभाग गोरक्षा प्रमुख दिनेश धनके, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुदर्शन महाराज साखरे, प्रणव रायचुरकर, पृथ्वीराज मोरे, तनिष्क रोचकरी, आशिष कांबळे, अनिकेत नवले यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या भेटीदरम्यान संघटनेच्या विविध कार्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सामाजिक व राजकीय विषयांवर सखोल चर्चा होऊन परस्पर सहकार्याच्या दृष्टीने सकारात्मक विचारमंथन करण्यात आले.

# व्ही. पी. कृषि महाविद्यालयाच्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये दोन विद्यार्थ्यांची निवड

आरंभ मराठी । धाराशिव

आयसीआयसीआय बँकेच्या कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रियेत व्ही. पी. शैक्षणिक संकुलातील कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून दोन विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली आहे. महाविद्यालयात नुकताच आयसीआयसीआय बँकेचा कॅम्पस प्लेसमेंट कार्यक्रम उत्साहात पार पडला. या प्लेसमेंट प्रक्रियेत अंतिम सत्रातील

एकूण ३० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेत सहभाग नोंदवला होता. त्यामधून वैष्णवी रमेश वाघ, अभिनव अंगद काळे, प्रतीक बालाजी नाईकनवरे, तन्वी सुनील देशमुख, दीप्ती संजय जाधव आणि अजय विजय घेवारे या सहा विद्यार्थ्यांची अंतिम मुलाखतीसाठी निवड करण्यात आली होती. अंतिम मुलाखतीनंतर वैष्णवी रमेश वाघ आणि अभिनव अंगद काळे यांची रिलेशनशिप मॅनेजर फार्मर फायनान्स या पदासाठी अंतिम निवड करण्यात आली. आयसीआयसीआय बँकेच्या शेतकरी वित्त विभागामध्ये निवड झालेल्या या विद्यार्थ्यांना कृषी कर्ज, अवजारे कर्ज, सोनेतारण कर्ज तसेच शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध वित्तीय योजनांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. या मुलाखती आयसीआयसीआय बँकेच्या शेतकरी वित्त विभागाचे एचआर व्यवस्थापक सुनील डोलास, रिजनल हेड प्रतीक श्रीयान तसेच एचआर व्यवस्थापक अवनेशा दास यांनी घेतल्या. कॅम्पस प्लेसमेंटमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील आणि करण प्रतापसिंह पाटील यांनी अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दैनिक आरंभ मराठी

## कृषी विभागाकडून फळबागायतदार शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

# एल निनोच्या संकटाला तोंड देण्यासाठी शेततळ्यांना प्राधान्य

आरंभ मराठी । धाराशिव

सन २०२६ मध्ये एलनिनोच्या प्रभावामुळे राज्यात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होण्याची तसेच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पावसातील अनियमितता, दीर्घ कोरडे कालखंड आणि भूजल पातळीत होणारी घट याचा थेट परिणाम शेती क्षेत्रावर होण्याची शक्यता असून, विशेषतः फळबाग पिकांसाठी ही परिस्थिती गंभीर ठरणार असल्याचे कृषि विभागाने म्हटले आहे. आंबा, डाळिंब, मोसंबी, द्राक्ष, पेरू, चिकू आदी फळपिकांना वर्षभर नियमित पाण्याची आवश्यकता असते. पाण्याअभावी फळगळ वाढणे, झाडांची वाढ खुंटणे, उत्पादनात घट होणे तसेच दीर्घकालीन आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. अनेक वर्षांच्या परिश्रमातून उभारलेल्या फळबागा पाणीटंचाईमुळे धोक्यात येऊ नयेत यासाठी शेतकऱ्यांनी आतापासूनच पाण्याचे नियोजन करणे अत्यावश्यक असल्याचे कृषि विभागाने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर शेततळे उभारणीस प्राधान्य देण्याचे आवाहन कृषि विभागामार्फत करण्यात आले आहे. शेततळे ही जलसंधारणाची प्रभावी व दीर्घकालीन उपाययोजना मानली जाते. पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी साठवून ते आवश्यकतेच्या काळात संरक्षित सिंचनासाठी वापरता येते. त्यामुळे कमी पावसाच्या परिस्थितीतही फळबागांचे संरक्षण करणे शक्य होते. तसेच भूजल पुनर्भरणालाही यामुळे मोठी मदत मिळते. शेततळ्यांमुळे फळगळ कमी होण्यास मदत होते, झाडांची उत्पादकता टिकून राहते तसेच उत्पादनाच्या गुणवत्तेत सुधारणा होते. ठिबक सिंचनासोबत शेततळ्यांचा वापर केल्यास कमी पाण्यात अधिक क्षेत्राला सिंचन देणे शक्य होत असल्याने जलसंधारण व पाणी वापर कार्यक्षमतेसाठी शेततळे अत्यंत उपयुक्त ठरत आहेत. महाडीबीटी प्रणालीअंतर्गत विविध योजनांमधून वैयक्तिक तसेच सामूहिक शेततळे उभारणीसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळ्यांचा लाभ दिला जात असून, एकात्मिक फलोत्पादन अभियानांतर्गत सामूहिक शेततळे व अस्तरीकरण घटकांसाठीही अनुदान उपलब्ध आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत जिल्ह्यातील निवडलेल्या १३८ गावांतील लाभार्थ्यांनी संबंधित संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत, असेही कृषि विभागाने म्हटले आहे. शेतामध्ये शेततळ्याची आवश्यकता असल्यास त्याबाबतची माहिती कृषि विभागाने उपलब्ध करून तत्काळ अर्ज करावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सविता तळेकर यांचा पाठपुरावा

आरंभ मराठी । वाशी

वाशी तालुक्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या व शैक्षणिक समस्यांबाबत पारगाव जिल्हा परिषद गटाच्या सदस्या सविता विकास तळेकर यांनी शिक्षण विभागाकडे पाठपुरावा सुरू केला आहे. वाशी येथे झालेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक संघाच्या कार्यक्रमात शिक्षकांनी मांडलेल्या अडचणींची दखल घेत त्यांनी शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती उषाताई गायकवाड यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत शिक्षकांच्या हिताचे निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.२४ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांची निवड श्रेणी मंजूर करणे, 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना' अर्ज प्रक्रिया वाशी येथेच राबवणे, विज्ञान-गणित शिक्षकांच्या रिक्त जागांवर पात्र शिक्षकांची नियुक्ती करणे, 'शाळा एकत्रीकरण' प्रक्रिया थांबवणे तसेच वाशी गटशिक्षण कार्यालयातील रिक्त लिपिक व शिपाई पदे भरण्याच्या मागण्या यावेळी करण्यात आल्या."शिक्षक हा समाजाचा कणा आहे. त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आम्ही कटिबद्ध असून मागण्या मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा सुरू राहील," असे सविता विकास तळेकर यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांचा माल संपताच सोयाबीनचे भाव तेजीत, व्यापारी मालामाल, शेतकरी मात्र तोट्यात

## यंदा हमीभावात ३८० रुपयांची वाढ तरीही सोयाबीन शेती परवडेनाशी

सुभाष कुलकर्णी । आरंभ मराठी

**तेर – खरीप हंगामातील प्रमुख नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोयाबीन पिकाने यंदा पुन्हा एकदा शेतकऱ्यांची निराशा केली आहे. २०२५-२६ हंगामात मोठ्या अपेक्षेने पेरणी केलेल्या सोयाबीन पिकाला सुरुवातीपासूनच निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका बसला. पेरणीच्या काळात समाधानकारक पाऊस झाल्याने जिल्ह्यासह मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची लागवड झाली होती. मात्र त्यानंतर कधी पावसाचा दीर्घ खंड तर कधी अतिवृष्टी अशा संकटांनी पिकाचे मोठे नुकसान केले. परिणामी अनेक शेतकऱ्यांना उत्पादनात मोठी घट सहन करावी लागली. त्यामुळे हमीभावापेक्षा कमी दराने सोयाबीन विकावे लागले. आता पाच वर्षांनी सोयाबीनच्या दराने सात हजारांचा टप्पा ओलांडला. मात्र त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही.**





खरीप हंगामात अनेक भागात पावसामुळे सोयाबीन डॅमेज झाले होते. ओलावा वाढल्याने दाण्यांचा दर्जा घसरला आणि व्यापाऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दर देत शेतकऱ्यांकडून माल खरेदी केला. काढणी, मजुरी, मशागत, बियाणे, खतांचे वाढलेले दर आणि तुटपुंजे उत्पादन यामुळे अनेक शेतकऱ्यांचा खर्चही निघाला नाही. त्यामुळे सोयाबीनची शेती अनेकांसाठी तोट्याची ठरल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळाले. दरम्यान, शेतकऱ्यांना पैशांची गरज असल्याने त्यांनी कमी भावातच माल विकून टाकला. शासनाच्या हमीभाव खरेदी केंद्रांना सुरुवात होण्यास उशीर झाल्याने बहुतांश शेतकऱ्यांना खुल्या बाजाराचा आधार घ्यावा लागला. त्यावेळी सोयाबीनला अपेक्षित दर मिळाला नाही. अनेकांनी ४५०० ते ५२०० रुपयांच्या दरम्यान माल विक्री केल्याचे सांगितले जाते. मात्र, आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. गेल्या काही दिवसांपासून खुल्या बाजारात सोयाबीनला ६५०० ते ७००० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. शेतकऱ्यांजवळील बहुतांश माल संपल्यानंतर बाजारात तेजी आली असून व्यापाऱ्यांनी वेअरहाऊसमध्ये साठवून ठेवलेल्या मालाला आता मोठा दर मिळत आहे. त्यामुळे व्यापारी आणि मोठे साठेबाज मालामाल होत असताना शेतकरी मात्र वाढत्या भावाकडे हतबलपणे पाहत असल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, अनेक व्यापाऱ्यांनी हंगामाच्या सुरुवातीलाच कमी दरात मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करून वेअरहाऊसमध्ये साठवले होते. काहींनी तारण कर्ज सुविधेचा लाभ घेत माल रोखून धरला. आता बाजारात आवक घटल्याने त्याच मालाला हजारो रुपयांचा अतिरिक्त नफा मिळत असल्याचे दिसत आहे. यामुळे बाजार व्यवस्थेचा सर्वाधिक फायदा व्यापाऱ्यांना आणि तोटा उत्पादक शेतकऱ्यांना होत असल्याची चर्चा आहे. बाजारातील तेजीचा फायदा प्रत्यक्ष उत्पादकाला मिळत नाही हीच खरी शोकांतिका आहे. शेतकरी अडचणीत असताना माल विकतो आणि भाव वाढल्यानंतर व्यापाऱ्यांचा फायदा होतो. सरकारने बाजार हस्तक्षेप वाढवून हमीभाव खरेदी वेळेत सुरू करणे आवश्यक असल्याची मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. दरम्यान, केंद्र सरकारने २०२६-२७ खरीप हंगामासाठी १४ पिकांचे हमीभाव जाहीर केले असून त्यामध्ये सोयाबीनचा हमीभाव ५७०८ रुपये प्रति क्विंटल निश्चित करण्यात आला आहे. गतवर्षीच्या ५३२८ रुपयांच्या तुलनेत यामध्ये ३८० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. मात्र ही वाढ उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यल्प असल्याची भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. गेल्या काही वर्षांत खतांचे दर, औषधे, मजुरी, डिझेल, मशागत खर्च मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. त्याचबरोबर हवामानातील अनिश्चिततेमुळे उत्पादनावरही परिणाम होत आहे. त्यामुळे हमीभावात वाढ झाली असली तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात फारसा नफा राहत नसल्याचे चित्र आहे.

### मागील पाच वर्षांतील सोयाबीन हमीभाव

| वर्ष | - | हमीभाव | - | वाढ |
|---|---|---|---|---|
| २०२२-२३ | - | ४३०० रु. | — | ००० |
| २०२३-२४ | - | ४६०० रु. | - | ३०० रु. |
| २०२४-२५ | - | ४८९२ रु. | - | २९२ रु. |
| २०२५-२६ | - | ५३२८ रु. | - | ४३६ रु. |
| २०२६-२७ | - | ५७०८ रु. | - | ३८० रु. |

### मोजक्या शेतकऱ्यांकडेच सोयाबीन शिल्लक


सोयाबीनच्या दरात चार वर्षानंतर मोठी वाढ झाली असली तरी त्याचा प्रत्यक्ष फायदा मात्र सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मिळत नाही. ऑक्टोबर महिन्यात नवीन सोयाबीन बाजारात आले तेव्हा सोयाबीनचे दर 3800 ते 4600 यादरम्यान होते. त्यावेळी दिवाळीचा सण आणि रब्बी हंगामातील पेरणी यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळील सोयाबीन किरकोळ दराने विकले. छोट्या व्यापाऱ्यांनी सोयाबीनची साठेबाजी करून भाव वाढल्यानंतर आत्ता ते त्याचा फायदा घेत आहेत. सोयाबीनचे दर वाढूनही शेतकऱ्यांना त्याचा काहीच फायदा होणार नाही.

### आठ दिवसात सोयाबीनच्या भावात मोठी वाढ

आंतरराष्ट्रीय बाजारातील चढउतारामुळे मागील आठ दिवसांपासून सोयाबीनचे भाव सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते. मागील आठवड्यात 8 मे रोजी सोयाबीनचे दर 6470 इतके होते. 9 मे रोजी 6600, 11 मे रोजी 6750, 12 मे रोजी 6800, 13 मे रोजी 6950, 14 मे रोजी 7150 तर 15 मे रोजी 7000 रुपये असे दर वाढत गेले. खाद्यतेलाचे दर देखील वाढत असल्याने हे दर आणखी वाढतील अशी शक्यता आहे. 2021 मध्ये जून महिन्यात सोयाबीनचे दर 11000 रुपये क्विंटल इतके वाढले होते. तीच परिस्थिती पुन्हा एकदा येणार असल्याचे बोलले जात आहे. दर आणखी वाढतील या अपेक्षेने शेतकरी सोयाबीन बाजारात विकायला तयार नाहीत.

# पोखरा योजनेतील 132 गावांसाठी जिल्हाधिकाऱ्यांचा महत्त्वाकांक्षी विकास आराखडा

## रोजगार, जलसंधारण व युवक सक्षमीकरणावर विशेष भर; आदर्श गाव निर्मितीचा संकल्प



आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात पोखरा योजनेअंतर्गत निवड झालेल्या १३२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश केवळ पोखरा योजनेपुरता मर्यादित न राहता ग्रामीण भागाचा एकात्मिक विकास साधणे हा असून, जलसंधारण, रोजगारनिर्मिती, युवक सक्षमीकरण आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक गावात किमान १० तरुण उद्योजक घडविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ग्रामीण युवकांना स्वावलंबी बनवण्यासाठी दाल मिल, हळद व मिरची पावडर प्रक्रिया उद्योग, ठिबक सिंचन, मत्स्य व्यवसाय, शेततळे, फळबाग लागवड तसेच विहीर पुनर्भरण यांसारख्या योजनांना चालना देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी 'एक खिडकी योजना' प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. कृषी विभागामार्फत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले जाणार असून, महिला व बालकल्याण तसेच समाजकल्याण विभागाच्या योजनांची व्यापक जनजागृती केली जाणार आहे. या उपक्रमात विविध सेवाभावी संस्थांचा सहभाग राहणार असून, विशेषतः आर्ट ऑफ लिव्हिंग या संस्थेचे स्वयंसेवकही सक्रिय भूमिका बजावणार आहेत. ग्रामस्थांना जीवनकौशल्य, सकारात्मक विचारसरणी व व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच गाव स्वच्छता व हागणदारीमुक्ती मोहिमेला गती देण्यात येणार आहे. प्रत्येक गावासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार असून, तलाठी, ग्रामसेवक, उमेद अभियानातील कर्मचारी व स्थानिक यंत्रणांना समन्वयाने काम करावे लागणार आहे. नियुक्त अधिकारी दर १५ दिवसांत किमान एक दिवस गावात मुक्कामी राहून ग्रामस्थांशी संवाद साधतील व समस्या सोडवतील. पुढील दोन वर्षांत हा उपक्रम प्रभावीपणे राबवून ग्रामीण भागात विकासाची नवी चळवळ उभी करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला असून धाराशिव जिल्ह्यात आदर्श गाव निर्मितीचा मार्ग प्रशस्त होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# कळंब शहरात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

## रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; 'शिवाजी कोण होता?' पुस्तकाचे वाटप

आरंभ मराठी । कळंब

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या ३६९ व्या जयंतीनिमित्त कळंब शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, वतीने शहरात उत्साहपूर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. येथील मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेडच्या वतीने सकाळी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य इंजिनीयर प्रकाश धस, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक अतुल गायकवाड, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष प्रा. जगदीश गवळी, ॲड. तानाजी चौधरी, ॲड. अशोक चोंदे, महेश कोळपे, ईश्वर काळे,सकल मुस्लिम युवक चे प्रदेश प्रवक्ते रमजान शेख,शिवाजीराव गिड्डे, संभाजी गिड्डे,ॲड. आबासाहेब मराठे,राजेश ढेंगळे, महादेव सुतार, राजेंद्र बिक्कड , शिवसेनेचे सुनील रितापुरे,आदी उपस्थित होते. जयंतीनिमित्त मराठा सेवा संघाच्या वतीने उपस्थितांना "शिवाजी कोण होता?" या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. तसेच आतषबाजी करून जल्लोषात जन्मोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान, शहरातील रौद्र शंभू प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिरास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. सायंकाळी जगदंब प्रतिष्ठानच्या वतीने शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि जयघोषात निघालेल्या या मिरवणुकीने संपूर्ण शहर देशभक्ती आणि शिवमय वातावरणाने दुमदुमून गेले होते.



# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त कळंबमध्ये भव्य गंगा आरती; शिवभक्तांची उत्स्फूर्त उपस्थिती

आरंभ मराठी । कळंब



कळंब येथे रुद्र शंभू प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य गंगा आरतीचे आयोजन करण्यात आले होते. नाशिकच्या पारंपारिक शैलीत सादर करण्यात आलेल्या गंगा आरतीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रमादरम्यान फुलांची उधळण तसेच आकर्षक फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. या सोहळ्यास शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात तब्बल ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. कार्यक्रमासाठी गंगा गोदावरी पंचकोठी पुरोहित संघ व अति प्राचीन महाआरती समिती, नाशिक यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून पंडित सदानंद देव उपस्थित होते. तसेच आरती अर्चक म्हणून पंडित पुष्कराज केतकर, पंडित मयुर तिवारी, पंडित अक्षय कुलकर्णी, पंडित मनोज तिवारी आणि पंडित यश घोडके यांनी मंत्रोच्चारात गंगा आरती सादर केली. या कार्यक्रमाची संकल्पना व आयोजन रुद्र शंभू प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोविंद खोसे, उपाध्यक्ष पार्थ कचरे तसेच श्रेयश धावारे, अतिश चव्हाण, हर्षद बावळे, तुषार काळे आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

आरंभ मराठी

## विविध शासकीय विभागांकडून तातडीने समस्यांचे निराकरण

# 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उत्साहात

मुरुम शहरात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' टप्पा क्र. १ शुक्रवारी जिल्हा परिषद मुलांच्या प्रशालेच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. नागरिकांच्या विविध महसुली अडचणी, दाखले, नोंदी दुरुस्ती तसेच प्रशासकीय प्रश्न सोडविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महसूल विभागासह विविध शासकीय विभागांनी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. शिबिरामध्ये विविध प्रकारचे दाखले, अर्ज, नोंदी दुरुस्ती, प्रलंबित प्रकरणांचा आढावा तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांनी सकाळपासूनच मोठ्या संख्येने उपस्थिती लावत शिबिराचा लाभ घेतला. या शिबिरासाठी आमदार प्रवीण स्वामी, उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, तहसीलदार गोविंद येरमे, जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील, उपनगराध्यक्ष रमेश चव्हाण, गटनेते निरजानंद अंबर, नगरसेवक राजेंद्र बेंडकाळे, अजित चौधरी, गौस शेख, कृषी विभागाचे डी. बी. रितापुरे, आरोग्य विभागाचे बिराजदार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश अर्दाळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आमदार प्रवीण स्वामी यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांनी बोलताना सांगितले की, शासनाच्या योजना आणि प्रशासन थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवून त्यांना शासकीय सेवांचा सुलभ लाभ मिळावा, हा या समाधान शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. तसेच महसूल, पंचायत समिती, आरोग्य, शिक्षण व इतर विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला. शिबिराचे नियोजन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले होते. नागरिकांच्या सोयीसाठी विविध विभागांचे स्वतंत्र कक्ष उभारण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांची कामे जलदगतीने पूर्ण करण्यात प्रशासनाला यश आले. अनेक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत भविष्यातही अशाच प्रकारची शिबिरे आयोजित करण्याची मागणी केली. शासनाच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.




### प्रमुख लोकप्रतिनिधींची अनुपस्थिती चर्चेचा विषय

मुरुम शहरात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या या महसूल समाधान शिबिरात मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित असताना नगर परिषदेचे नगराध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती तसेच गटविकास अधिकारी (BDO) यांच्या अनुपस्थितीची चर्चा नागरिकांमध्ये रंगली. शासनाच्या महत्त्वपूर्ण उपक्रमात प्रमुख लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित असताना त्यांची गैरहजेरी खटकली असल्याची प्रतिक्रिया काही नागरिकांनी व्यक्त केली. मात्र, उपस्थित अधिकाऱ्यांनी शिबिराचे कामकाज सुरळीत पार पाडले.

### प्रमाणपत्रासाठी नागरिकांना अनेक अडचणी

सर्वसामान्य नागरिकांना एखादे प्रमाणपत्र काढण्यासाठी असंख्य कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. त्यातून मानसिक त्रासही सहन करावा लागतो. अशा समाधान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी प्रभावी पर्याय निर्माण व्हायला हवा, असे मत नगरसेवक अजित चौधरी यांनी व्यक्त केले. याशिवाय अनेक समस्या अडचणीच्या कशा ठरत आहेत हे प्रशासनासमोर मांडले.

# जनगणनेच्या तयारीला वेग; लोहारा तहसील कार्यालयात डिजिटल साहित्याचे वाटप

आरंभ मराठी । लोहारा




भारतीय जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर लोहारा तहसील कार्यालयात घरयादी व घरगणना या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी आवश्यक साहित्याचे डिजिटल पद्धतीने वाटप करण्यात आले. देशातील पहिली पूर्णतः डिजिटल जनगणना ठरणाऱ्या या प्रक्रियेसाठी प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. जनगणना दोन टप्प्यांत पार पडणार असून, पहिल्या टप्प्यात घरांची यादी तयार करणे तसेच घरांची स्थिती आणि मूलभूत सोयीसुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या गणना केली जाईल. या वेळी प्रगणकांकडून कागदी नोंदीऐवजी विशेष विकसित केलेल्या मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित केली जाणार असल्याने प्रक्रिया अधिक जलद, अचूक आणि पारदर्शक होणार आहे. तालुक्यातील एकूण 217 प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना डिजिटल प्रणाली हाताळण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात घराचे स्वरूप (कच्चे/पक्के), पिण्याच्या पाण्याची सोय, वीज, शौचालय, स्वयंपाकाचे इंधन तसेच कुटुंबाकडे असलेली मालमत्ता (सायकल, कार, टीव्ही, इंटरनेट आदी) यासह सुमारे 1 ते 33 प्रश्नांची माहिती संकलित केली जाणार आहे. या उपक्रमासाठी जनगणना साहित्याचे वाटप तहसील कार्यालय लोहारा येथे मा. तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार रतन काजळे, श्री. अनिल अहिरे, महेश कुलकर्णी, वजीर अत्तार, जनगणना पर्यवेक्षक भिमाशंकर डोकडे, संनियंत्रण कक्षातील सदस्य सिद्धेश्वर बिराजदार, नयन शेख, जगताप सर, मोरे सर, कोरे, राठोड आदी उपस्थित होते. डिजिटल जनगणनेमुळे प्रशासनाचे काम अधिक गतिमान होणार असून, देशाच्या विकास नियोजनासाठी अचूक आणि अद्ययावत माहिती उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

आरंभ मराठी